# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन जिल्हा परिषद चंद्रपूर

## निविदा सुचना

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पाणी गुणवत्ता कार्यक्रमाच्या कामाची प्रभावी अंमलबजावणी जिल्हा / तालुका पाणी व स्वच्छता व्यवस्थापन सल्लागार, जिल्हा/तालुका डेटा एंट्री ऑपरेटर, मनुष्यबळ बाहयमंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेण्याकरीता संस्था नेमणूकीबाबत ई निविदा मागविण्यात येत आहे. निविदा व सुचना शासनाच्या www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर दिनांक 11/05/2026 रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन ते दिनांक 25/05/2026 रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल. सदर निविदा दिनांक 26/05/2026 रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येईल.

प्रकल्प संचालक (जजीमि)<br>
जिल्हा परिषद चंद्रपूर

मुख्य कार्यकारी अधिकारी<br>
जिल्हा परिषद चंद्रपूर

# निविदा अटी व शर्ती

१) संस्था ही मालकी हक्काचा फर्म / भागीदारी फर्म / खाजगी मर्यादित / मर्यादित कंपनी / कार्पोरेट संस्था इत्यादी आसावा/आणि योग्य नोंदणी प्राधिकरणाकडे कायदेशीररित्या स्थापन / नोंदणीकृत असावा.

२) संस्थेला आउट सोर्सिंग आधारावर मनुष्यबळ पुरवठा करण्याचा (जिल्हयात/समान संख्येचे मनुष्यबळ) दोन वर्षाचा अनुभव असल्या बाबत चे प्रमाणपत्र

३) राज्य कामगार विमा कायद्यानुसार वर्ग नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

४) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 नुसार नोंदणी प्रमाणपत्र व माहे मार्च 2025 पर्यंत रक्कम भरल्याची चालान प्रत जोडणे आवश्यक राहील.

५) सेवा कर कायद्यांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल.

६) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

७) निविदा स्विकृती आदेशापासून 15 दिवसांचे आत 3% सुरक्षा ठेव राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी स्वरूपात प्रकल्प संचालक, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे नावाने जमा करावी. न केल्यास निविदा रदद करण्याचे अधिकरी जि. प. कडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

८) ज्या निविदाकाराची निविदा स्विकृत करण्यात येईल त्या निविदाकारास योग्य त्या किंमतीच्या स्टॅम्पपेपरवर तात्काळ करारनामा करावा लागेल. त्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येईल. करारनामा करण्यास नकार दिल्यास किंवा टाळाटाळ केल्यास निविदाधारकाची संपूर्ण इसारा रक्कम जप्त करून लगतच्या न्युनतम दर असलेल्या निविदाकाराची निविदा मंजुर करण्यात येईल. करारनामा जरी केला असला तरीही कामकाज समाधानकारक नसल्यास कोणतेही कारण न देता करार रद्द करावयाचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

९) कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही स्तरावर निविदा ना-मंजुर करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

१०) पुरवठा केलेल्या मनुष्यबळाच्या संबधी कोणतेही शासनाचे सर्व प्रकारचे कर भरण्याची जबाबदारी निविदा धारकांची राहिल (उदा. GST / PT/IT इत्यादी.)

११) 1 जुलै 2017 पासून शासनाकडून लागू झालेले GST कपाती बाबतचे दर तसेच GST बाबत इतर अटी व शर्ती निविदाधारकांस (कंत्राटदारास) लागू राहिल. तसेच यापूढे वेळोवेळी GST संदर्भाने निर्गमित होणारे शासन निर्णय हे कंत्राटदारास बंधनकारक राहिल.

१२) मनुष्यबळ संख्या गरजेनुसार कमी किंवा जास्त करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी राखुन ठेवले आहे.

१३) निविदा धारकांचा लिफाफा क्रमांक 1 (तांत्रिक लिफाफा) असेल यात निविदा सुचनेनुसार नमुद केलेली कागदपत्रे सादर करावित. निविदा सुचनेमध्ये नमुद करण्यात आलेली कागदपत्रे लिफाफा क्रमांक 1 मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्रमांक 2 उघडला जाणार नाही.

१४) ई-निविदा हे निविदा धारक किंवा प्रतिनिधीच्या समक्ष उघडण्यात येतील. निविदा धारक किंवा प्रतिनिधी उपस्थित नसल्यास सुध्दा निविदा उघडण्यात येतील. निविदा उघडण्याची तारीख व वेळ यामध्ये काही प्रशासकीय अडचणी असल्यास त्यात बदल होऊ शकतो व तसा बदल झाल्यास शासनाचे पोर्टलवर व कार्यालयीन सुचना फलकावर लावण्यात येईल.

१५) निविदा धारकांना सदर निविदेबाबत काही अक्षेप नोंदवायाचे असल्यास त्यांनी निविदा पूर्व सभेमध्ये आपले म्हणने लेखी स्वरूपात सादर करावे लागेल. तदनंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही यांची नोंद निविदा धारकांनी घ्यावी.

१६) निविदा द्विबंद पध्दतीने सादर कराव्यात, आवश्यक दस्ताऐवज नियम व अटी लिफाफा क्रमांक 1 मध्ये दर (आकडयात अक्षरी) लिफाफा क्रमांक 2 मध्ये सादर करणे आवश्यक राहिल.

१७) सदर कामाची ई-निविदा फॉर्म ची नापरतावा रक्कम निविदा शुल्क व ईसार रक्कम हे SBI NET Banking Transaction अथवा इतर राष्ट्रीकृत बँके मार्फत Transaction द्वारे ऑनलाईन जमा करण्यात यावी. त्याशिवाय आपले निविदा फॉर्म अपलोड होणार नाही यांची नोंद घ्यावी.

१८) निविदेमधील कोणत्याही अटीचा भंग केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व केलेल्या कामाचा मोबदला गोठविण्यात येईल,

१९) संपूर्ण निविदा प्रक्रीयेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, चंद्रपूर हे सक्षम प्राधिकारी राहतील. संपूर्ण निविदा अथवा निविदेचा काही भाग कोणतेही कारण न देता स्विकृत किंवा अस्विकृत करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी. जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना असेल.

२०) निविदेस 2 मुदतवाढ दिल्यानंतरही 3 पेक्षा जास्त निविदा प्राप्त होत नसतील तर तिसऱ्या मुदतवाढीनंतर 3 पेक्षा कमो मात्र । निविदा प्राप्त झाल्यास, लिफाफा "अ" उघडण्याची कार्यवाही कार्यालय प्रमुख यांचे मार्फत करण्यात येईल. निविदाकार पात्र ठरल्यास दराचा लिफाफ व मुख्य कार्यकार अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे समोर उघडण्यात येईल. तदनंतरच निविदा मंजूरीचा निर्णय घेण्यात येईल.

२१) अंतीम दिनांक व विहित वेळेनंतर निविदा अर्ज स्विकारल्या जाणार नाही. तसेच ज्यांनी इसारा रक्कम भरलेली असेल, त्यांनी निविदा भरणे बंधनकारक आहे. निविदा न भरल्यास त्यांचे इसाराची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात येईल.

२२) भारत सरकार कार्यालयीन ज्ञापन क्र.सं. F.6/1/2023- वित्त मंत्रालय व्यय विभाग खरेदी धोरण विभाग २६४ सी, उत्तर ब्लॉक, नवी दिल्ली दिनांक: ६ जानेवारी, २०२३ अन्वये मनुष्यबळ आउटसोर्सिंग सेवांच्या खरेदीमध्ये किमान सेवा शुल्क 3.88% इतके असेल.त्या पेक्षा कमी सेवा शुल्क असलेल्या निवीदा स्वीकारण्यात येणार नाही.

२३) ज्यांची निविदा मंजुर होईल त्यांनी निविदा प्रपत्र व इतर सर्व मुळ कादपत्रे स्वाक्षांकीत करून घ्यावयाची आहे. निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्राबाबत संदिग्धता वाटल्यास सदर कागदपत्राची मागणी केल्यावर त्यांची मुळ प्रत कार्यालयाकडे तातडीने सादर करणे बंधनकारक राहील.

२४) कंत्राटी कामगार (नियम आणि निर्मुलन) अधिनियम 1970 व महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियम आणि निर्मूलन) अन्वये कामगार अधिकारी चंद्रपूर यांचेकडे नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. कंत्राटदाराचे लेबर रजिस्ट्रेशन पीएफ रजिस्ट्रेशन ई निविदा मंजुर झाल्यास निविदा मंजुरीच्या आदेशापासून एक महिण्याचे आद सादर करावे लागेल अन्यथा देयकाचे शोधन करण्यात येणार नाही.

२५) कोणत्याही परिस्थितीत कंत्राटदारास या निविदेतील कोणत्याही बाबीसाठी मंजुर दराव्यतीरित्क वाढीव दर मागण्याचा हक्क असणार नाही.

२६) निविदेमध्ये सहभागी निविदा धारकांने जि.प. मध्ये कोणत्याही टप्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्याची बयाणा रक्कम / सुरक्षा ठेव यातून वसुल करण्यात येईल. तसेच सदर कंत्राटदाराच्या देयकातून / अनामत रक्कम / सुरक्षा ठेव यातून वसुल करण्यात येईल व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. तथा त्यांना काळ्या यादीत टाकण्यात येईल.

२७) महा. शासन उद्योग व उर्जा कामगार विभाग शा.नि.क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दि.01/12/2016 मध्ये नमुद सर्व अटी व शर्ती पुरवठाधारकांवर बधनकारक राहतील तसेच वेळोवेळी या कार्यालयाकडून दिलेल्या सुचना बंधनकारक राहतील.

२८) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापूर्वी सर्व विमुक्ती केलेल्या उमेदवारांच्या नावांची यादी पुरविण्यात यावी.

२९) कंत्राटदाराने नेमलेल्या उमेदवारांशी जिल्हा परिषदेचा कोणताही संबंध नाही. तसेच उमेदवारांच्या संबंधीचे विविध विवादासाठी कंत्राटदार स्वतः जबाबदार राहतील तसेच या जिल्हा परिषद अंतर्गत का केल्यामुळे भविष्यात या जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर समावून घेण्याकरीता सदर कामगारास कोणताही दावा करता येणार नाही.

३०) निधीचे उपलब्धतेनुसार देयकाचे भुगतान करण्यात येईल काही कारणास्तव शसनाकडून विहित वेळेत निधी उपलब्ध न झाल्यास व देयकांचे भुगतानास विभागाकडून उशीर झाल्यास कंत्राटदारांना कोणत्याही प्रकारचे देयकावर व्याज किंवा इतर जादा रक्कम देण्यात येणार नाही.

३१) कंत्राटदार सस्थेकडून प्राप्त देयकातून नियमानुसार टी. डी. एस कपात कपात करण्यात येईल. शासकिय नियमानुसार प्राप्तीकर वगैरेच्या शासनास देय होणाऱ्या रक्कमा कंत्राटदाराच्या बिलातून कपात करुन घेण्यात येतील.

३२) सदरहु प्रकरणात विशिष्ट कार्यवाही करण्याची वेळ आल्यास व प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्यास त्यांची मर्यादा चंद्रपूर न्यायालयापर्यंत मर्यादित राहील याप्रकरणी होणारा खर्च कंत्राटदाराकडून वसुल केल्या जाईल.

३३) इतर अटी व शर्ती शा. नि. नुसार किंवा निविदा समिती जिल्हा परिषद चंद्रपूर ह विहित कार्यपद्धतीत सुचीत करतील त्यानुसार त्या त्या वेळी लागु करण्यात येईल.

३४) शासन नियमानुसार बाह्य यंत्रणेद्वारे पुरविल्या जाणाऱ्या मनुष्यबळांचे मानधन जि.एस.टी. रक्कम कमी झाल्यास पाणी व स्वच्छता विभाग, जि.प. चंद्रपूर कमी झालेली रक्कम निविदाधारकांस अदा करणार नाही.

३५) शासन नियमानुसार बाह्य यंत्रणेद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतन व जी.एस.टी. रक्कम यामध्ये वाढ किंवा घट झाल्यास सदर रक्कम ग्राह्य धरण्यात येईल. परंतू व्यवस्थापन शुल्कांच्या रक्कमेत वाढ केली जाणार नाही.

३६) कोणतेही कारण न देता निविदा कोणत्याही टप्यावर अंशतः किंवा पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार निविदा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. चंद्रपूर यांना राहतील.

३७) सदर निविदेबाबत काही वाद उद्भवल्यास त्या संबंधाने कायदेशीर कार्यवाहीची कक्षा जिल्हा सत्र न्यायालय, चंद्रपूर असले.

प्रकल्प संचालक (जजीमि)
जिल्हा परिषद चंद्रपूर

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद चंद्रपूर

## तांत्रीक लिफापा क्रमांक-०१

**ई निविदा भरतांना तांत्रीक लिफापा क्रमांक ०१ मध्ये खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रति अपलोड करणे अनिवार्य आहे.या सर्व तांत्रीक कागदपत्रांची पुर्तता करणारे निविदाधारकच आर्थिक निविदेकरीता पात्र ठरतील.**

१) संस्था ही मालकी हक्काचा फर्म/भागीदारी फर्म/खाजगी मर्यादित/मर्यादित कंपनी/कार्पोरेट संस्था इत्यादी असावा आणि योग्य नोंदणी प्राधिकरणा कडे कायदेशीर रित्या स्थापन/नोंदणीकृत असावा.

२) संस्था कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायद्या अंतर्गत योग्य अधिकारी यांचे कडे नोंदणीकृत असावा (EPF)

३) कर्मचारी राज्य विमा कायद्या अंतर्गत योग्य अधिकारी यांचे कडे नोंदणीकृत असावा (ESIC REG).

४) संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियमन आणि निर्मुलन) कायदा, १९७० या सह कामगार अधिकार नियमाखाली नोंदणी कृत असावा.

५) वस्तु व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र (GST)

६) संस्थेची मागील तीन आर्थिक वर्षा मध्ये आऊट सोर्सिंग द्वारे मनुष्यबळ पुरवठा करावयाच्या व्यवसायातुन
सरासरी उलाधाल (जिल्हयात नियुक्त केलेल्या मनुष्यबळाच्या अंदाजे एका वर्षाच्या पगाराच्या किमान ५ पट) असावी.

७) संस्थे कडे गेल्या तीन आर्थिक वर्षात सरासरी सकारात्मक निव्वळ संपत्ती (जिल्हयात नियुक्त करावयाच्या मनुष्यबळाच्या अंदाजे एक महिन्याच्या पगाराच्या किमान ३ पट) असणे आवश्यक आहे.

८) संस्थेला आउट सोर्सिंग आधारावर मनुष्यबळ पुरवठा करण्याचा (जिल्हयात/समान संख्येचे मनुष्यबळ) दोन वर्षाचा अनुभव असल्या बाबत चे प्रमाणपत्र.

९) संस्थेने केंन्द्र/राज्य/निमसरकारी/सरकारी उपक्रम संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था/पीएसयुसाठी किमान एक समान करार यशस्वीरित्या पुर्ण केलेला असावा.

१०) संस्थेने महाराष्ट्र राज्यात किमान या सारख्या समान कामाचे एक तरी करार यशस्वी पुर्ण केलेल्या चे प्रमाणपत्र.

११) संस्था कोणत्याही राज्य सरकार किंवा केंद्र सरकार विभाग/केंद्र शाशित प्रदेश/स्थनिक प्राधिकरण/केंद्र आणि राज्य सरकार उपक्रम किंवा सरकारी संस्थांनी संबंधीत किंवा निवीदा धारकास काळया यादीत टाकलेले किंवा निलंबीत केलेले अद्यावत ५०० रुपयाचे स्टॅाप पेपरवर घोषणापत्र.

१२) Out sourcing आधारावर मनुष्यबळ पुरवठा करण्याबाबतचे ISO प्रमाणपत्र.

१३) निविदा फी रुपये १९००/- व इसारा रक्कम रुपये ९५००/- ऑनलाईन पध्दतीने स्टेट बँक ऑफ इंडीया च्या नेट बैंकींग द्वारे भरणा केले बाबतचे बँक पावती अथवा सदर बाबीमध्ये सुट असल्यास सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन अपलोड करावे. इतर प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

१४) संस्थेचे पॅन कार्ड

प्रकल्प संचालक (जजीमि)
जिल्हा परिषद चंद्रपूर

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद चंद्रपूर

# <u>आर्थिक लिफापा क्रमांक -०२</u>

**<u>निविदाधारकाने आर्थिक दर नमूद करतांना खालील प्रमाणे दर नमूद करावे</u>**

१) आर्थिक लिफापा क्रमांक ०२ (Financial Bid) BOQ मध्ये निविदाधारकाने/ संस्थेने **अनुक्रमांक १ ते ४ पर्यंतच्या पदांचे दर नमूद करतांना <u>मासीक वेतन आणि सेवा शुल्क दर (Service Charge) सह</u> नमूद करावे.**

२) **अनुक्रमांक सर्व पदाचे दर नमूद करतांना <u>फक्त सेवा शुल्क दर (Service Charge)</u> नमूद करावे.**

वरील सविस्तर अटी शर्ती नुसार नमुद केलेल्या १ ते १४ कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती तांत्रीक निविदा क्रमांक ०१ मध्ये अपलोड करणे अनिवार्य राहील. वरील नमुद आवश्यक कागदपत्रा पैकी एकही कागदपत्राची पुर्तता न केल्यास आपली निविदा अपात्र केली जाईल व या बाबत आपले कोणतेही म्हणणे अथवा पत्रव्यवहार ग्राहय धरल्या जाणार नाही.

ज्या बाहय यंत्रणा संस्थेला काम मंजुर करण्यात येईल.कामाचा आदेश देणे पुर्वी त्यांचे कडुन शासकीय कायदयानुसार ठरवुन दिलेल्या रक्कमेच्या बॉन्ड पेपरवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.चंद्रपूर तथा जिल्हा प्रकल्प संचालक जल जीवन मिशन जि.प.चंद्रपूर यांनी निश्चित केलेल्या अटी व शर्ती नुसार WASH PMUs ला दिलेल्या मुदतवाढीसाठी ई-निविदा लागू राहील.

प्रकल्प संचालक (जजीमि)
जिल्हा परिषद चंद्रपूर

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद चंद्रपूर

**मनुष्यबळ यांचे किमान अर्हता व अनुभव कर्तव्य व जबाबदाऱ्या :**

| अ.क्र. | मनुष्यबळ | किमान अर्हता | किमान अनुभव | कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|
| १ | घनकचरा व्यवस्थापन सल्लागार जिल्हास्तर २ पदे | बी.ई. डिप्लोमा (सिव्हील) | बी.ई. पदवीधारक किमान २ वर्षे डिप्लोमा पदविकाधारक किमान ५ वर्षे | ग्रे वॉटर व्यवस्थापन व पाण्याच्या स्त्रोताचा शाश्वत विकास यांच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावरील यंत्रणांना सहाय्य करणे, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन इत्यादी योजना तयार करण्यासाठी गावांना मदत करणे, सुरू असलेल्या विविध कामांची तांत्रिक दृष्टया पाहणी करणे, कामांच्या गुणवत्तेचे निरीक्षण करणे, अंमलबजावणीशी संबंधित विविध यंत्रणा आणि ग्रामपंचायत यांना मार्गदर्शन करणे इ. जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना सोपविलेले इतर कोणतेही कामे / कार्य पार पाडणे. |
| २ | डेटा एन्ट्री ऑपरेटर जिल्हास्तर १ पदे | पदविधारक व MSCIT कोर्स पूर्ण असावा. | किमान १ वर्षे | टिपण्या आणि पत्रे टंकलिखीत करणे, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील विविध माहितीचे संकलन करणे, एम.आय.एस. प्रणालीमध्ये सर्व माहिती भरणे, आवश्यकतेनुसार अहवाल तयार करणे, संबधित अधिकाऱ्यांनी नेमूण दिलेली इतर कोणतेही कामे/कार्य पार पाडणे. |
| ३ | सनियंत्रण व मुल्यमापन तज्ञ जिल्हास्तर १ पद | कोणत्याही विषयातील पदवी किमान ६०% गुणांसह व संगणकाचे ज्ञान-MS-Office प्राधान्य — गणित/संख्याशास्त्रामधील पदवी Advance Diploma course in Computer (Data Bank Management) किंवा तत्सम. | स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागामधील M.I.S. व सनियंत्रणाबाबत जिल्हास्तरावरील २ वर्षे चा अनूभव. ऑनलाईन संगणक प्रणालीबाबत अनूभव. **प्राधान्य** : जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हास्तरावरील अनूभव असल्यास प्राधान्य. | प्रगतीचे मूल्यमापन, सनियंत्रण आणि I.M.I.S. भरणे व त्यांचे विश्लेषण करणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | शिपाई जिल्हास्तर १ पद | १० वी पास | -- | कार्यालय प्रमुखाने सांगीतलेले सर्व कामे. |
| ५ | घनकचरा व्यवस्थापन सल्लागार तालुकास्तर १५ पदे | बी.ई. डिप्लोमा (सिव्हील) | बी.ई. पदवीधारक किमान १ वर्षे डिप्लोमा पदविकाधारक किमान १ वर्षे | ग्रे वॉटर व्यवस्थापन व पाण्याच्या स्त्रोताचा शाश्वत विकास यांच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावरील यंत्रणांना सहाय्य करणे, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन इत्याद योजना तयार करण्यासाठी गावांना मदत करणे, सुरू असलेल्या विविध कामांची तांत्रिक दृष्टया पाहणी करणे, कामांच्या गुणवत्तेचे निरीक्षण करणे, अंमलबजावणीशी संबंधित विविध यंत्रणा आणि ग्रामपंचायत यांना मार्गदर्शन करणे इ. जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांन सोपविलेले इतर कोणतेही कामे / कार्य पार पाडणे. |
| ६ | डेटा एन्ट्री ऑपरेटर तालुकास्तर १५ पदे | पदविधारक व MSCIT कोर्स पूर्ण असावा. | किमान १ वर्षे | टिपण्या आणि पत्रे टंकलिखीत करणे, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील विविध माहितीचे संकलन करणे, एम.आय.एस. प्रणालीमध्ये सर्व माहिती भरणे, आवश्यकतेनुसार अहवाल तयार करणे, संबधित अधिकाऱ्यांनी नेमूण दिलेली इतर कोणतेही कामे/कार्य पार पाडणे. |
| ७ | पाणी गुणवत्ता सल्लागार उपविभागीय स्तर ४ पदे | कोणत्याही शाखेत पदवी किंवा प्रतिष्ठित विद्यापीठातून समकक्ष पदवी संबंधित क्षेत्रात रसायनशास्त्रातील पदवीला प्राधान्य दिले जाईल. | किमान 1 वर्षाचा अनुभव. | पाण्याच्या गुणवत्तेबाबत विविध जीआर, परिपत्रके, पत्रे आणि देखरेख यांच्या अंमलबजावणीची जबाबदारी घेणे.<br>गावांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये पिण्याच्या आणि सुरक्षित पाण्याबद्दल जागरूकता निर्माण करणे<br>घरोघरी भेटी देऊन आणि शाळेतून<br>उपविभागातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांबद्दल माहिती अद्ययावत करणे.<br>जलसुरक्षा, क्षमता बांधणी इत्यादींसाठी पाठपुरावा करणे.<br>गावातील पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम झालेल्या वस्त्यांमध्ये पाण्यामुळे होणाऱ्या आजारांबद्दल ग्रामस्थांना माहिती देणे.<br>ग्रामसेवक आणि इतर सरकारी कर्मचाऱ्यांना<br>रासायनिकरित्या प्रभावित पाण्याच्या नमुन्याबद्दल माहिती देणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम झालेल्या स्रोतांसाठी उपाययोजना.<br>शमन करण्यासाठी बीडीओ, वैद्यकीय अधिकारी, उपअभियंता यांच्याकडे पाठपुरावा करणे.<br>उपविभागातील सर्व वस्त्यांची पाण्याची गुणवत्ता माहिती संकलित करणे.<br>आयएमआयएस वरील माहिती अद्ययावत करणे.<br>वर्षातून दोनदा सर्व वस्त्यांमध्ये स्वच्छता सर्वेक्षणासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करणे.<br>स्वच्छता सर्वेक्षणादरम्यान आढळून आलेल्या कमतरतेचे निवारण करण्यासाठी पाठपुरावा करणे.<br>उपविभागातील वस्त्यांमध्ये फील्ड टेस्ट किट, आयईसी मटेरियल इत्यादींचे वितरण आणि देखरेख करणे.<br>ब्लॉक पातळी, जिल्हा पातळीवरील कार्यशाळा/प्रशिक्षण इत्यादींना उपस्थित राहणे.<br>ब्लॉक पातळीवरील पाणी गुणवत्ता समितीच्या बैठका दरमहा घेतल्या जातात की नाही याचा आढावा घेणे. |

प्रकल्प संचालक (जजीमि)
जिल्हा परिषद चंद्रपूर

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद चंद्रपूर

Validate | Print | Help

# Item Rate BoQ

**Tender Inviting Authority:** Executive Engineer RWS Z P Chandrapur.

**Name of Work:**

**Contract No:**

| Name of the Bidder/ Bidding Firm / Company : | |
|---|---|

**PRICE SCHEDULE**

(This BOQ template must not be modified/replaced by the bidder and the same should be uploaded after filling the relevent columns, else the bidder is liable to be rejected for this tender. Bidders are allowed to enter the Bidder Name and Values only)

| NUMBER # | TEXT # | NUMBER # | TEXT | NUMBER | NUMBER # | NUMBER # | TEXT # |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Item Description | Quantity | Units | Estimated Rate | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder Rs. P | TOTAL AMOUNT Without Taxes | TOTAL AMOUNT In Words |
| 1 | 2 | 4 | 5 | 6 | 13 | 53 | 55 |
| 1 | ITEM | | | | | | |
| 1.01 | जल जीवन मिशन अंतर्गत पाणी व स्वच्छता घनकचरा सल्लागार ( जिल्हा ) | 1.000 | Nos | 0.00 | | 0.00 | INR Zero Only |
| 1.02 | जल जीवन मिशन अंतर्गत पाणी व स्वच्छता घनकचरा सल्लागार ( तालुका) | 1.000 | Nos | 0.00 | | 0.00 | INR Zero Only |
| 1.03 | जल जीवन मिशन अंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटर ( जिल्हा ) | 1.000 | Nos | 0.00 | | 0.00 | INR Zero Only |
| 1.04 | जल जीवन मिशन अंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटर (तालुका ) | 1.000 | Nos | 0.00 | | 0.00 | INR Zero Only |
| 1.05 | जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता सल्लागार उपविभाग | 1.000 | Nos | 0.00 | | 0.00 | INR Zero Only |
| 1.06 | जल जीवन मिशन अंतर्गत सनियंत्र मुल्यमापन सल्लागार (IMIS / M & E) | 1.000 | Nos | 0.00 | | 0.00 | INR Zero Only |
| 1.07 | स्वच्छ भारत मिशन अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन सल्लागार | 1.000 | Nos | 0.00 | | 0.00 | INR Zero Only |
| 1.08 | जल जीवन मिशन अंतर्गत शिपाई | 1.000 | Nos | 0.00 | | 0.00 | INR Zero Only |
| Total in Figures | | | | | | 0.00 | INR Zero Only |
| Quoted Rate in Words | | INR Zero Only | | | | | |

PROJECT DIRECTOR
JAL JEEVAN MISSION
ZILLHA PARISHAD, CHANDRAPUR

Chief Executive Officer
Zilla Parishad, Chandrapur

Signature Not Verified
Digitally signed by NUTAN VILASRAO SAWANT
Date: 2026.05.11 04:07:26 PDT
Location: Maharashtra-MH